नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २६/०४/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## फसवणुक

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०५ कि मी अंतरावरील खराडा पूर्णवसन मारोडी येथे दिनांक २५/०४/२०२२ चे ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी वय ३४ वर्ष हिला तिची मैत्रिणने म्हटले की, आरोपी नामे— अजय उर्फे जय गजानन चौधरी याने इन्टॉग्राम वर तुझ्या फोटोचे स्टोरी व प्रोफाइल ठेवले आहे. त्याचे स्किन शॉट व्हॉटसप वर पाठविले. तेव्हा फिर्यादीने विचारले असता 'मला तुझ्या सोबत लग्न करायचे आहे, तु माझ्या सोबत लग्न केल नाही तर तुझे लग्न दुसऱ्या सोबत होवू देणार नाही व विष खावून मरुन जाईन व तुला फसविन' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ६६(सी) माहिती तत्रज्ञान अधिनियम २०००, सहकलम ५०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री हेमंतकुमार खराबे हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत १२ कि. मी अंतरावरील मौजा मोरफाटा येथे दिनांक २५/०४/२०२२ चे १३.१५ वा. सुमारास वय अंदाजे ३५ वर्ष अनोळखी पुरूष मृतक ईसम हा राष्ट्रीय महामार्ग क. ४४ हायवे रोडच्या सर्वीस रोडच्या बाजुने गर्रा रोड कडे जाणाऱ्या रोडच्या बाजुला फाटावर रोड लगत असलेल्या दगडावर मृत अवस्थेत उबडया स्थितीत मिळुन आला. त्यास फिर्यादी यांनी ग्रामीण रूग्णालय देवलापार येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी नापोशी विजय परमेश्वरे यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक दिलीप टेकाम मो.क्र. ८४४६६०८१५२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत ०८ कि. मी अंतरावरील मौजा उमरी येथे सौ. निर्मला मंगेश कोकोडे यांची वय १ दिवसाची मुलगी ( मृतक ) असुन दि. २२/०४/२२ चे ०३.३० वा. चे दरम्यान ग्रामीण रूग्णालय देवलापार येथुन जन्म झाले होते. तिची प्रकृती खराब झाल्याने तिचा उपचार करून ग्रामीण रूग्णालय देवलापार येथुन मेडीकल हॉस्पीटल नागपुर केज्युल्टी येथे नेले असता दि. २२/०४/२२ चे सायंकाळी ०५.१५ वा. डॉक्टरांनी तिला तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अशोक उईके मो.क्र. ९३७३६५१४७१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**